# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ / चैत्र २, १९४८ (शके)**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) उप मुख्यमंत्री**
**(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(५) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री**

**} यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

### मुंबईतील अंधेरी परिसरात भेसळयुक्त दुधाचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१) * ७२०२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने शुद्ध व सुरक्षित दूध पुरवठा होणे आवश्यक असून, भेसळयुक्त अन्न पदार्थांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासन विभागाची असून अंधेरी (प), मुंबई येथील कपासवाडी परिसरात भेसळयुक्त दुधाचा पुरवठा होत असल्याची बाब दिनांक २८ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने दखल घेऊन भेसळयुक्त दुधाची तपासणी करुन सदर भेसळ रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींविरोधात मोक्का अथवा अन्य कायद्याअंतर्गत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नरहरी झिरवाळ :** (१) व (२) अन्न व औषध प्रशासनास प्राप्त गोपनीय माहितीनुसार दिनांक ३१/१२/२०२५ रोजी पहाटे डी.एन.नगर पोलीस ठाण्याच्या पथकासह अंधेरी पश्चिम येथील कपासवाडी येथे दूध भेसळीच्या माहितीची शहानिशा केली असता सदर ठिकाणी दूध भेसळीचा प्रकार आढळून आला नाही.

तथापि, वर्सोवा पोलीस ठाण्याच्या पथकासह नवजित नगर, रहिवासी सेवा संघ, संत लुईस मार्ग, ४ बंगला हनुमान मंदिराजवळ, अंधेरी (प), मुंबई ४०००५३ येथे एकूण ७ ठिकाणी छापा टाकला असता सदर ठिकाणी अमूल व गोकुळ या नामांकित ब्रॅन्डचे लेबल असलेल्या दूधामध्ये पाण्याची भेसळ करण्याचा प्रकार उघडकीस आला. सदर ठिकाणाहून दूध भेसळ करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

सदर कारवाईत एकूण १४ दुधाचे नमुने विश्लेषणासाठी घेतले असून उर्वरित भेसळयुक्त दुधाचा साठा ९५८ लिटर एकूण किंमत रुपये ५८६२५/- जप्त करून नष्ट करण्यात आला आहे. सदर सर्व अन्न नमुने अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले होते. सदरचे सर्व नमुने अन्न विश्लेषक यांनी कमी दर्जाचे घोषित केले आहेत.

सदर प्रकरणी ७ भेसळखोर दूध विक्रेत्यांना तात्काळ पोलिसामार्फत अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात फिर्याद क्र.११०५/२०२५ दिनांक ३१/१२/२०२५ नोंदविण्यात आली आहे. सदर फिर्यादीत खालीलप्रमाणे कायद्याची कलमे लावण्यात आलेली आहेत.

१. भारतीय न्यायसंहिता (B.N.S), २०२३ कलम २७४, कलम ३४५, कलम ३४७ (१), कलम ३(५)

२. अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम, २००६ कलम ५९, कलम ६३, कलम २६, कलम २७, कलम ३१

सदर प्रकरणी मा.न्यायालयात खटले दाखल करण्यासाठी सर्व नमुन्यांचे विश्लेषण अहवाल दिनांक २४/०२/२०२६ रोजी वर्सोवा पोलीस स्टेशन यांच्याकडे देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हाडाचे नाव व लोगोचा गैरवापर करुन गिरणी कामगारांची फसवणूक करण्यात येत असल्याबाबत

**(२) * ६९०३ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलू आणि वांगणी येथे गिरणी कामगारांसाठी ८१ हजार घरे खाजगी विकासकांच्या माध्यमातून बांधण्याचा निर्णय गृहनिर्माण विभागाने घेतला असून, त्यानुसार या घरांसाठी गिरणी कामगारांकडून ऐच्छिकपणे संमतीपत्र, अर्ज भरुन घेतले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मे.चढ्ढा डेव्हलपर्स नामक विकासक व त्यांचे कर्मचारी हे कामगारांशी संपर्क साधून तसेच म्हाडाचे नाव व लोगोचा गैरवापर करुन गिरणी कामगारांचा प्रकल्प चढ्ढा समूहाकडून विकसित करण्यात येत असल्याचे भासवून गिरणी कामगारांची फसवणूक करित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाने निवडलेल्या मे.चढ्ढा डेव्हलपर्स ॲण्ड प्रमोटर्स ह्यांच्याकडून काही दिवसांपासून कामगारांना चुकीची माहिती देऊन कामगारांचे संमतीपत्र भरुन घेण्यात येत असून वांगणी येथील विकासकाने गिरणी कामगारांची फसवणूक करून त्यांच्याकडून पैसे घेतल्याने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने (म्हाडा) विकासकाला नोटीस पाठविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत अनेक वर्षांपासून गिरणी कामगार व संघटना हक्काच्या घरासाठी लढा देत असून अजूनही बहुतांश गिरणी कामगार घरांपासून वंचित असून मुंबईत घर मिळावे, अशी मागणी त्यांनी केली आहे, तर गिरणी कामगार संघटनांच्या काही प्रतिनिधींनी सेलू भागात बांधलेल्या घरांच्या किमती कमी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गिरणी कामगारांची फसवूणक करणाऱ्या विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १५/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार शक्तीप्रदत्त समितीच्या मान्यतेने विहित प्रक्रियेअंती शेलू व वांगणी येथे बांधण्यात येणाऱ्या घरांबाबत गिरणी कामगारांकडून ऑनलाईन पद्धतीने (आधारकार्ड आधारित) संमतीपत्र घेण्यात येत आहेत.
(२) व (३) म्हाडा प्राधिकरणाने दिनांक ०८/११/२०२४ व दिनांक २९/११/२०२४ च्या पत्रान्वये म्हाडाच्या लोगोचा अनधिकृतपणे वापर करीत असल्याबाबत चढ्ढा डेव्हलपर्स यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला होता. सद्य:स्थितीत चढ्ढा डेव्हलपर्स यांचेकडून म्हाडाचा लोगो वापरण्यात येत नसल्याचे म्हाडा प्राधिकरणाने कळविले आहे.

गिरणी कामगारांकडून ऑनलाईन पद्धतीने (आधारकार्ड आधारित) संमतीपत्र घेण्यात येत आहेत. त्यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गिरणी कामगारांकडून सुधारीत संमतीपत्र घेण्याबाबत दिनांक ०४/१२/२०२५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) गिरणी कामगारांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १५/०३/२०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रामधील ३०० चौ.फु. घरांची अंदाजित किंमत रुपये १५ लक्ष इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्यापैकी रुपये ५.५० लक्ष इतके अनुदान राज्य शासन देणार असून, रुपये ९.५० लक्ष इतका गिरणी कामगारांचा हिस्सा असणार आहे.
(५) गिरणी कामगारांकडून ऑनलाईन पद्धतीने (आधारकार्ड आधारित) संमतीपत्र घेण्यात येत आहेत. त्यासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने गिरणी कामगारांकडून सुधारीत संमतीपत्र घेण्याबाबत दिनांक ०४/१२/२०२५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वांद्रे रेल्वे स्थानक ते म्हाडा कार्यालयादरम्यान आकाशमार्गिका उभारण्याबाबत

**(३) * ६९२९ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नागरिकांच्या सुरक्षित व सुलभ प्रवासासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून वांद्रे रेल्वे स्थानक ते म्हाडा कार्यालयादरम्यान आकाशमार्गिकेची (स्कायवॉक) उभारणी केली जात असून, सदर कामामुळे काही जलवाहिन्या आणि पर्जन्य जलवाहिन्या बाधित होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वांद्रे पूर्व आणि वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (BKC) परिसरात शासकीय, निम-शासकीय आणि खाजगी कार्यालये असून याठिकाणी दररोज मोठ्या संख्येने लोक येत असून आकाशामार्गिका नसल्यामुळे लोकांना अरुंद आणि धोकादायक फूटपाथवरून चालावे लागत असल्यामुळे अपघातांचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम अंतिम टप्प्यामध्ये आले असतानाही प्रकल्पाचा खर्च रुपये १७ कोटींनी वाढला असून प्रकल्पाच्या खर्चात वाढ होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, कोणतेही बांधकाम करताना भूमिगत सेवा सुविधांची माहिती घेऊनच सल्लागार आराखडा तयार केला जात असतानाही वांद्रे पूर्व रेल्वे स्थानक ते म्हाडा कार्यालयापर्यंत बांधण्यात येणाऱ्या आकाशमार्गिकेच्या (स्कायवॉक) बांधकामाचा अतिरिक्त खर्च वाढण्याची कारणे तपासून आकाशमार्गिकेचे काम जलदगतीने पूर्ण करुन नागरिकांच्या वापरासाठी खुली करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) वांद्रे पूर्व स्थानकापासून वांद्रे कुर्ला संकूल तसेच इतर शासकीय व निम-शासकीय कार्यालयात जाणाऱ्या लोकांना आकाशमार्गिकेअभावी अरुंद पदपथावर चालावे लागत होते. तथापि, वांद्रे पूर्व ते म्हाडा कार्यालय येथील आकाशमार्गिकेचे काम पूर्ण करुन दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी जनतेस वापरासाठी खुला करण्यात आल्याने सद्य:स्थितीत लोकांची आकाशमार्गिकेवरुन ये-जा करणे सुलभ झाले आहे.

(३) हे खरे आहे.

प्रथमत: प्रकल्पाचा मूळ आराखडा मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बनविण्यात आला होता. यानंतर व्ही.जे.टी.आय., मुंबई व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार अतिरिक्त मार्गिकेचे व जिन्याचे बांधकाम प्रस्तावित करण्यात आले. यामध्ये पश्चिम द्रुतगती मार्गावरील सेवा रस्त्यावर २४०० मी.मी. व्यासाच्या जलवाहिन्या आढळून आल्याने आकाशमार्गिकेच्या चार खांबांचे पुनर्संरेखन करणे अनिवार्य झाले. त्यामुळे गर्डरच्या लांबीमध्ये वाढ झाली. प्रकल्पाच्या अंदाजपत्रकामध्ये तुळयांची अधिकाधिक लांबी २८ मीटर इतकी होती. परंतु प्रत्यक्ष काम करताना खांबांची जागा बदलल्याने तुळयांची अधिकाधिक लांबी ३२ मीटर इतकी झाल्याने प्रकल्प खर्चात वाढ झाली आहे.

(४) प्रकल्पांचे नियोजन करताना जल विभागाच्या २४०० मी.मी. व्यासाच्या जल वाहिनीची अचूक माहिती उपलब्ध नव्हती व अतिरिक्त बांधकामांतही वाढ झाली. सद्य:स्थितीत प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात आले असून दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी आकाशमार्गिका जनतेच्या वापराकरीता खुली करण्यात आली आहे.

(५) वांद्रे पूर्व आकाशमार्गिकेबाबत दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी दिलेल्या कार्यादेशानुसार सदर काम दिनांक २४ मे, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निश्चित करण्यात आले. तथापि, बांधकामात झालेली वाढ व इतर अपरिहार्य तांत्रिक कारणास्तव सदर कामास ७ महिन्याचा विलंब झाला असून, हे काम दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी पूर्ण झाले आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये क्षयरोग निदानाच्या CB-NAAT कार्ट्रिजेसचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(४) * ७८५२ श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयात क्षयरोग निदानासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'रॅपिड मॉलिक्युलर टेस्ट कार्ट्रिजेस'चा (CB-NAAT/TrueNat) गेल्या काही महिन्यांपासून प्रचंड तुटवडा जाणवत असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्ट्रिजेसच्या तुटवड्यामुळे रुग्णांचे निदान २ ते ३ महिने लांबणीवर पडत असून, परिणामी वेळेवर उपचार न मिळाल्याने संसर्ग पसरण्याचा धोका वाढला असून, केंद्र शासनाकडून मिळणारा पुरवठा विस्कळीत झाला असताना, राज्य शासन किंवा महानगरपालिकेने स्थानिक पातळीवर पर्यायी खरेदी करून कार्ट्रिजेसचा तुटवडा दूर करण्याबाबत उपाययोजना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्रीय क्षयरोग विभागाच्या सूचना आणि राज्य शासनाच्या निर्देशांनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विभागांमध्ये क्षयरोग जनजागृती मोहिमेअंतर्गत बाईक रॅली, मॅरेथॉन, पथनाट्य, आरोग्यविषयक व्याख्याने आणि जिंगल्सद्वारे माहिती देऊन क्षयरोगाच्या संपर्कातील व्यक्तींना जागरूक करण्यासाठी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत क्षयरोग निवारणासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत काय, तसेच औषध प्रतिरोधक क्षयरोग रुग्णांची वाढ रोखण्याच्या दृष्टीने गुणवत्ताधारित निदान सेवेमध्ये सातत्याने सुधारणा, नवीन औषध उपचार पद्धती आणि महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने DR-TB रुग्णांना मार्गदर्शन व सहाय्य प्रदान करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, बहु-औषध प्रतिरोधक क्षयरोगाच्या (MDR-TB) रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या क्षयरोग रुग्णालयात निदानाची प्रक्रिया वेगवान करण्यासाठी तसेच मुंबईतील क्षयरोग (TB) निदानाच्या 'रॅपिड टेस्ट कार्ट्रिजेस'च्या तुटवडा भरुन काढण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत CB-NAAT (Cartridge Nucleic Acid Amplification Test) काट्रिजेसचा पुरवठा केंद्र शासनामार्फत केला जातो. माहे नोव्हेंबर, २०२५ ते डिसेंबर, २०२५ या कालावधीत CB-NAAT या काट्रिजेसचा अल्पकालीन तुटवडा निर्माण झाला होता.
(२) CB-NAAT व TrueNat या दोन्ही चाचण्या क्षयरोग निदानासाठी समान स्वरूपाचे कार्य करीत असल्याने तसेच आवश्यकतेनुसार थुंकी तपासणी (Microscopy Examination) व स्पुटम स्मिअर मायक्रोस्कोपी (Sputum Microscopy) नियमितपणे करण्यात येत असल्याने क्षयरोग निदान प्रक्रियेत कोणताही विलंब झाला नाही. पर्यायी निदान सुविधा उपलब्ध असल्यामुळे रुग्णांचे वेळेत निदान व उपचार सुरू करण्यात आले.

केंद्र शासनाकडून CB-NAAT काट्रिजेसचा पुरवठा माहे जानेवारी, २०२६ पासून पुन्हा नियमितपणे सुरू झालेला असून मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कोणतीही टंचाई नाही.

(३) हे खरे आहे.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाच्या (National TB Elimination Programme) मार्गदर्शक सूचनांनुसार जनजागृतीसाठी बाईक रॅली, वॉकाथॉन, पथनाट्य, आरोग्य विषयक व्याख्याने व आरोग्य शिबिरे इत्यादी उपक्रम महानगरपालिकेकडून नियमितपणे राबविण्यात येतात.

(४) केंद्र व राज्य सरकार यांच्याकडून प्राप्त मार्गदर्शक सूचनानुसार मुंबई महानगरपालिकेमार्फत टीबी (TB) मुक्त भारत अभियान उपक्रम राबविण्यात येत आहे.

निदान झालेल्या औषध प्रतिरोधक टीबी रुग्णांवर त्वरित योग्य ते उपचार सुरू करण्यात येतात. विशेष रुग्णांमध्ये मुंबईमध्ये बीपाल्म (BPALM) उपचार पद्धती औषध प्रतिरोधक टीबी रुग्णांसाठी सुरू करण्यात आली आहे. DR-TB उपचार केंद्रांवर रुग्णांना वेळोवेळी समुपदेशन करुन मार्गदर्शन व सहाय्य प्रदान समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपनगरीय रुग्णालय तसेच क्षयरोग रुग्णालय, शिवडी यांच्याकडून राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येतात.

(५) राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत CB-NAAT काट्रिजेसचा पुरवठा केंद्र शासनामार्फत केला जातो. तथापि, CB-NAAT काट्रिजेसचा तुटवडा निर्माण झाल्यास, आवश्यकतेनूसार स्वनिधीमधून स्थानिक स्तरावर खरेदी करण्याची बृहन्मुंबई महानगरपालिकेची तयारी आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे महानगर परिवहन महामंडळातील सीएनजी बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रक्रियेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(५) * ७९४७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ई-बसचा वापर मोठ्या प्रमाणात होत असताना पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) ५०० सीएनजी बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रक्रियेत पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना डावलून कोट्यवधी रकमेचा गैरव्यवहार केल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएमपीएमएलच्या स्वमालकीच्या एक हजार सीएनजी बसेस, पीएम ई-ड्राईव्ह अंतर्गत एक हजार ई-बसेस ताफ्यात दाखल होणार असल्यामुळे बसेसची संख्या वाढत असताना ५०० सीएनजी बसेस भाडेतत्त्वावर घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ई-बसचा पर्याय स्वस्त असतानाही, सीएनजी बसचा किमती पर्याय स्वीकारून शासनाच्या निधीचा अपव्यय करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

परिवहन महामंडळामार्फत जीसीसी तत्त्वावर ५०० नग सीएनजी, नॉन एसी, बीआरटी, बीएस-६ बसेस ड्रायवर व कंडक्टरसह बसेस घेण्याची प्रक्रिया राबविण्याकरीता संचालक मंडळाची वित्तीय वर्ष – २०२५-२६ मधील सभा क्र.०४ दिनांक २०/११/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वा. आयोजित केल्याबाबत बैठकी करीता आयुक्त, पुणे महानगरपालिका, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, आयुक्त, पीएमआरडीए, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल प्रादेशिक परिवहन अधिकारी, डायरेक्टर सीआयआरटी यांना उपस्थित राहण्याबाबत दिनांक २०/११/२०२५ रोजी ३.०१ मिनिटांनी ई-मेलव्दारे कळविण्यात आले होते.

बैठकीकरीता आवश्यक गणपूर्ती पूर्ण होत असल्याने, तथापि, बहुमताची आवश्यकता असल्याने सदर सभेत मान्य ठराव सर्व संचालकांकडे अनुमोदनासाठी पाठविण्यात आला होता. त्यास संचालक मंडळाने बहुमताने अनुमोदन दिले आहे. तसेच, संचालक मंडळाच्या निर्णयाचा वृत्तांत सर्व संचालकांना अवलोकनार्थ व सूचनांसाठी पाठविण्यात आला आहे.

त्यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना डावलून ५०० सीएनजी बस भाडेतत्त्वावर घेण्यासाठी निविदा प्रक्रिया केल्याची बाब खरी नाही. त्याचप्रमाणे दिनांक ०९/०२/२०२६ रोजीच्या ईमेल संदेशाव्दारे मे. वैष्णवी ट्रान्सपोर्ट, मे. ॲन्टोनी रोड ट्रान्सपोर्ट सोल्युशन प्रा.लि., मे. ट्रॅव्हल टाईम मोबेलिटी इंडीया प्रा.लि., मे.श्री.बालाजी रोडलाईन्स व मे.तिरूपती ट्रॅव्हल ॲण्ड गुड्स सर्व्हिस प्रा.लि. यांना परिवहन महामंडळाकरीता जीसीसी तत्त्वावर सीएनजी बसेस ड्रायव्हर व कंडक्टरसह उपलब्ध करुन देण्याकरीता देण्यात आलेल्या कार्यादेशास व करारनाम्यास संचालक मंडळाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे. तसेच, अद्याप सदर ५०० बसेसपैकी एकही बस परिचलनात आलेले नाही.

(२) पीएम ई-ड्राईव्ह अंतर्गत १००० ई-बसेसची मागणी करण्यात आली आहे. सदर बसेसची निविदा प्रक्रिया केंद्र शासनाच्या सीईएसएलमार्फत सुरू आहे. सदर बसेस येण्यास बराच कालावधी लागणार आहे.

महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण सन २०२१ नुसार किमान २५% सार्वजनिक वाहतूक वाहने ही बॅटरी इलेक्ट्रिक वाहन प्रकारातील असावीत. परिवहन महामंडळाच्या ताफ्यात एकूण १९६१ बसेस असून त्यापैकी २७% इलेक्ट्रिक बसेस आहेत.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पुणे, पिंपरी-चिंचवड, पीएमआरडीए क्षेत्रामध्ये बसेसचे संचलन करण्यात येते. आयटीडीपी यांच्या अहवालानुसार सन २०२५ अखेरीस पुणे महानगराची लोकसंख्या १.०३ कोटी आहे. निकषानुसार व लोकसंख्या प्रमाणानुसार प्रती १ लाख लोकसंख्येसाठी ६० बसेसची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे पुणे महानगर परिसरात एकूण लोकसंख्या १.०३ कोटी साठी ६००० बसेसची आवश्यकता आहे. पीएमआरडीए भागात बसेसची मागणी वाढत असून महामंडळामार्फत ग्रामीण भागात बसेसचे संचलन करण्यात येत आहे. सद्य:स्थितीत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे एकूण १९६१ बसेस आहेत. त्यापैकी १३ बसेस स्क्रॅप होणार आहेत.

त्यामुळे सुमारे ४००० बसेसची आवश्यकता आहे. प्रतिदीनी महामंडळाच्या बसेसमधून सुमारे १२ लाख प्रवासी प्रवास करतात. पीएम ई-ड्राईव्ह अंतर्गत १००० ई-बसेस येण्यास बराच कालावधी जाणार आहे. सद्य:स्थितीत पीएमपीएमएलकडे ५३५ ई-बसेस आहेत. ई-बसेस साठीचे डेपोंची संख्या मर्यादित

असून चार्जिंगचे पॉईंटस्‌देखील मर्यादित आहेत. त्यामुळे विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास पूर्ण डेपोचे संचलन थांबते. अशा परिस्थितीत जास्तीच्या सीएनजी बसेस त्या परिसरात संचलनासाठी द्याव्या लागतात. त्यामुळे ई-बसेस सोबत सीएनजी बसेसही आवश्यक आहेत.
(३) सदर प्रकरणी पीएमपीएमएल यांच्याकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाबाहेर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(६) * ८०९३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण झाले असून मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी करणे हे या विमानतळाचे उद्दिष्ट असून, नवी मुंबई, मुंबई, ठाणे आणि पुण्यातील प्रवाशांना या विमानतळाचा फायदा होणार असून सदर विमानतळ अटल सेतू, सायन-पनवेल मार्ग, मुंबई-पुणे हायवे, Metro आणि हार्बर लोकलने जोडलेले हे आशियातील सर्वात मोठे विमानतळ बनविण्याचा प्रयत्न आहे, नवी मुंबई मेट्रोचे काम अपूर्ण असल्याने आणि नागपूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शहरांतून येणाऱ्या विमानांना सकाळी मुंबईत उतरण्यासाठी योग्य वेळ (स्लॉट) उपलब्ध नसल्यामुळे दळणवळणाची मोठी अडचण निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतून या विमानतळावर जाण्यासाठी उपलब्ध असलेल्या अटल सेतूचा मार्गे रुपये ५०० टोल आणि तसेच पेट्रोल डिझेलचा खर्च देखील किमान रुपये १०००/- पेक्षा अधिक आहे, तसेच विमानतळाबाहेर पाम बीच रोडपर्यंत शौचालय, हॉटेल किंवा वैद्यकीय सुविधा यांसारख्या प्राथमिक नागरी सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(३) मुंबई आणि नवी मुंबई या दोन्ही आंतरराष्ट्रीय विमानतळांदरम्यानचा प्रवास आता अधिक वेगवान आणि सुखकर होण्याकरीता राज्य शासनाने मुंबई आणि नवी मुंबई विमानतळे जोडणारी महत्त्वाकांक्षी ‘मुंबई मेट्रो लाईन ४ व ८’ या मार्गिकेला मंजुरी दिली असून सदर मार्गिकेचे बांधकाम सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मेट्रो मार्गिका तीन वेगवेगळ्या मेट्रो मार्गांशी जोडली जाणार असून, (Mumbai Metro Expansion) मोठ्या प्रमाणातील प्रवासी वाहतूक सुलभ होणार असून अंदाजे १८ हजार कोटी रुपये बजेटचा हा प्रकल्प पीपीपी (सार्वजनिक-खाजगी भागीदारी) तत्त्वावर उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, प्रवाशांवर पडणारा हा आर्थिक भार आणि नागरी सुविधांच्या अभावाची शासनाने दखल घेऊन विमानतळ परिसरात रुंद रस्ते, पदपथ, सुव्यवस्थित ड्रेनेज आणि सांडपाणी व्यवस्था यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासाचेही नियोजन करुन आवश्यक सोयीसुविधा पुरविण्यासाठी व राज्यांतर्गत विमान वाहतुकीला प्राधान्य देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या व दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन मा.पंतप्रधान महोदयांच्या हस्ते दिनांक ०८/१०/२०२५ रोजी करण्यात आले असून सदर विमानतळाच्या देशांतर्गत उड्डाण सेवा दिनांक २५/१२/२०२५ पासून सुरु झाल्या आहेत.

नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ (बेलापूर ते पेंढर) चे काम पूर्ण झाले असून हा मार्ग कार्यान्वित झाला आहे. नागपूरहून नवी मुंबई विमानतळावर उड्डाण उपलब्ध आहे. दिनांक २९/०३/२०२६ पासून सुरू होणाऱ्या उन्हाळी वेळापत्रकानुसार विमान कंपन्यांनी दररोज एकूण ७४ देशांतर्गत उड्डाणे नियोजित केली आहेत आणि त्यामध्ये कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर विमानसेवा नियोजित आहे.

(२) अटल सेतूवरील हलक्या मोटर वाहनांसाठी (कार) लागू असलेला पथकर रुपये २५०/- इतका असून हलके व्यावसायिक वाहन / मिनी बसकरीता पथकर रुपये ४००/- इतका आहे.

नवी मुंबई विमानतळाबाहेर पाम बीचपर्यंत सुमारे २ कि.मी. एवढ्या अंतरासाठी प्रवेश नियंत्रण महामार्ग स्वरुपात उड्डाणपुल मार्ग असल्याने सदर अंतरासाठी प्राथमिक नागरी सुविधा उपलब्ध नाहीत.

(३) व (४) नवी मुंबई मेट्रो लाईन ८ चा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed Project Report - DPR) पूर्ण झाला आहे. या प्रकल्पासाठी भारत सरकार व राज्य सरकारकडून प्रत्येकी २०% आवश्यकत्ता असल्यामुळे, निधीची भारत सरकारकडे VGF अर्ज तयार करण्यासाठी Peer Review व Transaction Advisor नियुक्त करण्याची प्रक्रिया सिडको (CIDCO) मार्फत सुरू आहे. तसेच सवलतधारक (Concessionaire) निवडीसाठी बोली प्रक्रिया व्यवस्थापनाचे काम सुरू आहे.

प्रवाशांच्या अखंड आणि सुलभ हालचालीसाठी मेट्रो लाईन ८ ला CSMIA टर्मिनल २ स्थानकावर मेट्रो लाईन ७ आणि मेट्रो लाईन ३ सोबत प्लॅटफॉर्म स्तरावर एकत्रीकरण (Platform Level Integration) करण्यात येणार आहे.

मेट्रो लाईन ८ ला मेट्रो लाईन ४, लाईन २बी, तसेच प्रस्तावित नवी मुंबई मेट्रो लाईन १ए सोबत प्रवासी बदल व्यवस्था (Passenger Interchange) देण्याचे नियोजन आहे. याशिवाय कुर्ला येथील उपनगरी रेल्वे स्थानक, LTT येथील लांब पल्ल्याच्या रेल्वे स्थानकासोबत तसेच मानखुर्द येथील आंतरराज्य बस स्थानक (ISBT) यांच्याशीही जोडणी करण्यात येणार असून, त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशासाठी (MMR) खऱ्या अर्थाने बहुविध (Multi-modal) वाहतूक जोडणी उपलब्ध होणार आहे. पीपीपी (PPP) तत्त्वावर प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(५) सध्या, नवी मुंबई विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात प्रवाशांवर अनावश्यक आर्थिक भार-किंवा मूलभूत नागरी सुविधांचा पद्धतशीर-अभाव असल्याचे कोणतेही विशिष्ट निष्कर्ष-समोर आलेले नाहीत.

नवी मुंबई विमानतळ प्रभाव क्षेत्रात नागरी सुविधांचा विकास आणि पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा टप्याटप्प्याने करण्यात येत आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील 'पीएम ई-बस' सेवा चालक व वाहकांचे प्रशिक्षण प्रलंबित असल्याबाबत

**(७) * ८१९३ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेअंतर्गत दिव्यांग स्नेही 'पीएम ई-बस' सेवा ही चालक आणि वाहकांचे प्रशिक्षण पूर्ण न झाल्यामुळे प्रलंबित असल्याची माहिती मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दिली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत दिनांक १८ डिसेंबर, २०२५ रोजी जेडीबीएम कंपनीकडून ३० बसेस प्राप्त होऊन आणि त्यांची आरटीओ नोंदणी प्रक्रिया पूर्ण होऊनही केवळ प्रशिक्षणाअभावी या बसेस डेपोमध्ये उभ्या असल्याने शासकीय निधीचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील दिव्यांगांना मतदानाचा हक्क सुलभतेने बजावता यावा याकरीता दिनांक १५ जानेवारी, २०२६ रोजी दिव्यांग मतदारांना त्यांच्या घरापासून मतदानकेंद्रापर्यंत ने-आण करण्यासाठी मोफत वाहन व्यवस्था करण्यात आली असताना देखील प्रशासकीय दिरंगाईमुळे दिव्यांगांच्या सोयीसाठी वाहन व्यवस्था उपलब्ध होऊ शकली नाही त्यामुळे प्रवाशांना त्रास सहन करावा लागला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने संबंधित कंपनीकडून प्रशिक्षण पूर्ण करून सेवा सुरू करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना करण्यात येत आहे, तसेच शासन अशा महत्त्वपूर्ण प्रकल्पांमध्ये बसेस प्राप्त होण्यापूर्वीच कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेस सेवा पुरवठादार कंपनीकडून ३० बसेस प्राप्त झाल्या आहेत. याकरीता लागणारे प्रशिक्षण हे विशेषत: दिव्यांग प्रवाशांकरीता सोईचे असलेले हायड्रॉलिकशी संलगनीत असल्याने मा.उच्च न्यायालयाने देखील नोंद घेवून रितसर प्रशिक्षण देण्यात सहमती दर्शविली.
(३) हे खरे नाही.

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील दिव्यांग व जेष्ठ नागरिक मतदारांना हक्क सुलभरितीने बजावता यावा यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे. मतदान केद्रांवर दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी सर्व झोनमध्ये व्हिलचेअर तसेच सहाय्यक कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले होते. तसेच याबाबत निवडणुक अधिकारी यांना लेखी सूचना देण्यात आलेल्या होत्या. तसेच दिनांक १५/०१/२०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडण्याकरीता शहर बस वाहतूक सुरु करण्यात आलेली होती. याबाबत शहर बस ऑपरेटर यांना लेखी सूचना दिल्या होत्या.
(४) पीएम-ईबस सेवेच्या अनुषंगाने चालक व वाहक यांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात आलेले असून मा.पंतप्रधान यांचे हस्ते दिनांक १४/०२/२०२६ रोजी आभासी पद्धतीद्वारे आभासी पद्धतीने लोकार्पण करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत पीएमई बस सेवा नियमितपणे सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये वित्तीय स्वरुपाच्या पदांकरीता वाणिज्य शाखेतील पदवी अनिवार्य करण्याबाबत

**(८) * ८३२५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य लोकसेवा आयोगाने लेखाकोषागार विभाग, स्थानिक निधी लेखा विभाग, वन विभाग, महानगरपालिका तसेच विविध शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये लेखा, लेखापरीक्षण व वित्तीय स्वरुपाच्या पदांसाठी भरती करताना पूर्वी वाणिज्य शाखेतील पदवी (कॉमर्स) किंवा अर्थशास्त्राची पदवी असणे आवश्यक होते, परंतु यात बदल करुन कोणतीही पदवी असा निर्णय घेतल्याने प्रत्यक्षात लेखाशास्त्र, लेखापरीक्षण, करप्रणाली, वित्तीय व्यवस्थापन पदवीधरांनी संताप व्यक्त केला असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयामुळे लेखा व वित्तीय कामकाजास तांत्रिक स्वरूप असूनही संबंधित पदांवर विषयातील तांत्रिक ज्ञान नसलेल्या उमेदवारांची नियुक्ती होण्याची शक्यता निर्माण झाल्याने शासनाच्या आर्थिक व्यवहार, लेखापरीक्षण प्रक्रिया व वित्तीय शिस्तीवर विपरीत परिणाम होऊ शकतो, ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाणिज्य शाखेला तांत्रिक दर्जा देण्यात यावा, लेखा, लेखापरीक्षण व वित्तीय स्वरूपाच्या पदांसाठी वाणिज्य पदवी अनिवार्य करावी तसेच नव्या पदवीधरांना संधी मिळावी यासाठी अनुभवाची अट रद्द करावी या वाणिज्य शाखेच्या पदवीधरांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत, महाराष्ट्र लेखा व कोषागारे संचालनालय अधीनस्त फक्त सामान्य प्रशासन विभागाच्या नियमानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून पदभरती होणाऱ्या कनिष्ठ लेखापाल आणि लिपिक-टंकलेखक या गट-क संवर्गातील पदांसाठीच कोणतीही पदवी ही शैक्षणिक अर्हता हा बदल सेवाप्रवेश नियमात करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील अधिकारी हे वित्त विभागाव्यतिरिक्त इतर प्रशासकीय विभाग व त्या विभागांच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, प्राधिकरणे इ. ठिकाणी कार्यरत असून त्यांना वेगवेगळी वित्तीय आस्थापना आणि लेखा विषयक कामकाज पार पाडावे लागते. तसेच, शासनाच्या विविध योजना, ध्येय धोरणे, शासन निर्णय विचारात घेऊन वित्त विषयक बाबींबाबत सल्ला घ्यावा लागतो. त्यामुळे, अधिकाऱ्यांकडे विविध विषयाचे ज्ञान, माहिती व अनुभव असणे आवश्यक ठरते. त्यामुळे, सेवाप्रवेश नियमाचे पुनर्विलोकन केल्यास वित्तीय शिस्तीवर परिणाम होण्याची शक्यता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीची विकासकामे निकृष्ट दर्जाची करण्यात येत असल्याबाबत

**(९) * ८३३१ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे कुंभमेळ्याच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात येत असून या कामांना गती देण्यासाठी व कामांचे सहनियंत्रण करण्यासाठी नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राधिकरणाच्या माध्यमातून आतापर्यंत हजारो कोटी रुपयांच्या विकासकामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली असून, त्यात जिल्ह्यातील रस्त्यांच्या कामांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाडीवऱ्हे येथे बेलगाव कुऱ्हे नांदूरवैद्य साकुरफाटा रस्त्याचे काँक्रिटीकरण निकृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्याला महिन्याभरात भेगा पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत माहिती घेऊन नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळा निमित्त विविध विभागांमार्फत करण्यात येत असलेली रस्ते, पूल, घाट व अन्य कामे उत्कृष्ट दर्जाची करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर रस्त्याचा दिनांक १४/०१/२०२६ रोजी अध्यक्ष, नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण तथा विभागीय आयुक्त, नाशिक यांनी पाहणी दौरा केला असता ३ ठिकाणी तडे (Cracks) आढळून आले. सदरचे तडे (Cracks) असलेले भाग सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदर कामाचा तपासणी दौरा अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांनी दिनांक ०३/०२/२०२६ रोजी केला असून, त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

क्षेत्रीय ठिकाणी नव्याने संकलन केलेल्या ग्रॅन्युलर सब-बेस साहित्याचे शासकीय प्रयोगशाळेतून चाळणी विश्लेषण चाचणी करून त्याचे निष्कर्ष मानकांप्रमाणे आढळून आल्यानंतर पुढील काम करण्यात आले आहे.

(४) सिंहस्थ कुंभमेळा निमित्त विविध विभागामार्फत करण्यात येत असलेली रस्ते, पूल, घाट व अन्य कामे उत्कृष्ट दर्जाची करण्याच्या दृष्टीने सदरची कामे EPC आधारित असून सदर कामांचा गुणवत्ता व दर्जा राखण्याच्या दृष्टीने Authority Engineer ची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदरच्या कामांची

IIT Powai मार्फत सुद्धा वेळोवेळी तपासणी करण्यात येत आहे. नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकारणामार्फत कामांची गुणवत्ता व दर्जा तपासणीसाठी Third party quality control agency ची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.पाटेगाव (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील पैठण-पंढरपूर या महामार्गासाठीच्या भूसंपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(१०) * ८३७७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.पाटेगाव (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील स्थानिक शेतकऱ्यांची गट नं.१३४/१ मधील ०४.६२ हे.आर.चौ.मी. शेतजमीन ही राष्ट्रीय महामार्ग ७५२-ई या पैठण-पंढरपूर पालखी मार्गासाठी दिनांक ८ जून, २०२३ रोजी वा त्यादरम्यान संपादित करुनही संबंधित शेतकऱ्यांना शेतजमिनीचा मोबदला (मावेजा) मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ.पैठण व मौ.पाटेगाव (ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील स्थानिक शेतकऱ्यांनी शेत जमिनीचा मावेजा देण्यात यावा अशी मागणी मा.जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर, तहसिलदार पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई व मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांच्याकडे दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने स्थानिक शेतकऱ्यांना संपादित जमिनीचा मोबदला (मावेजा) देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशतः खरे आहे.

पैठण (पाटेगाव)-हादगाव-शिरूर (पालखी मार्ग) हा महामार्ग रा.म.क्र. ७५२-ई असा वर्गीकृत असून या महामार्गाची एकूण लांबी ५५.९३ कि.मी. आहे. सदर महामार्गाच्या दुपदरीकरणाचे काम सा.बां. विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित आहे. राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२-ई पैठण-शिरूर या महामार्गासाठी मौजे पाटेगाव येथील गट नंबर १३४ मधील ४६२ चौरस मी. जागा संपादित होत आहे. सदरील भूसंपादन निवाडा उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, पैठण-फुलंब्री यांनी दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी जाहीर केला आहे. सदरील निवाडा सक्षम प्राधिकरणास मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

(३) व (४) भूसंपादन निवाडा सक्षम प्राधिकरणाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आला असून सदर निवाड्यास सक्षम प्राधिकरणाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांना मावेजा (मोबदला) देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे ऊस वजनकाट्यांमधील तफावतीमुळे आर्थिक नुकसान होत असल्याबाबत

**(११) * ८४२८ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची साखर कारखान्यांच्या ऊस वजनकाट्यांव्दारे फसवणूक होऊन आर्थिक नुकसान होत असून, शेतकऱ्यांच्या उसाच्या वजनाच्या नोंदीमध्ये खाजगी वजनकाट्यावर व साखर कारखान्याच्या वजनकाट्यावर तफावत येत असल्याच्या अनेक तक्रारी माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील विश्वास सहकारी साखर कारखाना, चिखली येथे ऊस पाठविण्यापूर्वी पलूस तालुक्यातील एका ऊस उत्पादक शेतकऱ्याने इस्लामपूर येथील खाजगी वजनकाट्यावर ऊसाचे वजन केले असता सुमारे २ टनांचा फरक आढळून आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऊस वजन प्रक्रियेत पारदर्शकता व शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी साखर कारखान्यांच्या आवारात कॅलिब्रेटेड व ऑनलाईन (केंद्रीय सर्व्हरशी संलग्न) वजनकाटे बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) माहे, जानेवारी, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास खाजगी वजनकाट्यावर व साखर कारखान्याच्या वजनकाट्यावर नोंद झालेल्या वजनामध्ये तफावत आढळून येत असल्याबाबतची तक्रार या यंत्रणेत प्राप्त झालेली नाही.

(२) नाही, याबाबत कुठलीही तक्रार प्राप्त नाही.

(३) खाजगी वजनकाटे व साखर कारखान्यांचे वजनकाटे हे दोनही वैध मापनशास्त्र विभागाकडून प्रमाणित करण्यात येतात व त्याकरीता नियमाप्रमाणे एकसमान कार्यपद्धत अवलंबिण्यात येते. त्यामुळे वैध मापनशास्त्र यंत्रणेकडून खाजगी वाहन काट्यावर वजन केलेल्या ऊसाचे वजन ग्राह्य धरण्याबाबत साखर आयुक्त, पुणे यांना दिनांक ०२/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार साखर आयुक्त पुणे यांनी त्यांच्या दिनांक ०९/११/२०२२ च्या पत्रान्वये सर्व साखर कारखान्यांना खाजगी वाहन काट्यावर वजन केलेल्या ऊसाचे वजन ग्राह्य धरण्याबाबतचे निर्देश दिलेले आहेत. तसेच ऊस वजन प्रक्रियेत पारदर्शकता व शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी साखर कारखान्यांच्या आवारात कॅलिब्रेटेड व ऑनलाईन (केंद्रीय सर्व्हरशी संलग्न) वाहन काटा बसविणे या बाबींची व्यवहार्यता तपासणे विचाराधीन आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयामध्ये रुग्णांच्या तपासणीसाठी यंत्रे सामुग्री खरेदी करण्याबाबत

**(१२) * ८५७८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल (के.ई.एम.) रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांवर जलदगतीने वैद्यकीय उपचार करता यावे याकरीता सिटीस्कॅन, एमआरआय, सोनोग्राफी यंत्रे खरेदी करण्याचा निर्णय रुग्णालय प्रशासनाने घेतला असून, या यंत्र खरेदीचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्याकडे दीर्घकाळ प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, के.ई.एम. रुग्णालयात मुंबई, पनवेल, कर्जत, खोपोली, मुरबाड, शहापूर, ठाणे, पालघर, विरार आदी भागातून दररोज अनेक रुग्ण विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी तसेच शस्त्रक्रियेसाठी येत असून त्यासाठी त्यांना कधी एमआरआय, सिटीस्कॅन, सोनोग्राफी आदी करून त्याचे अहवाल तज्ज्ञ डॉक्टरांना सादर करणे अत्यंत महत्वाचे असते, उक्त रुग्णालयात कधी कधी रूग्णांना मोफत देय असलेली औषधेही नसल्याच्या तक्रारी रुग्णांकडून करण्यात येत आहेत, त्यातच एमआरआय, सिटीस्कॅन, सोनोग्राफीसाठी प्रतीक्षा करावी लागते अथवा त्या रुग्णांना नाईलाजाने महागड्या दराने सदर एमआरआय, सिटीस्कॅन, सोनोग्राफी करून घ्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात रुग्णांना बेड उपलब्ध होण्यास तसेच दाखल झालेल्या रुग्णांच्या विविध तपासण्या करण्याकरीता एक आठवड्याचा कालावधी लागत असल्याची बाब निदर्शनास आली असून, रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, प्रशासकीय कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी, प्रशासकीय अधिकारी, तंत्रज्ञ यांची रिक्त पदे भरली जावीत याकरीता रुग्णालय प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,

(४) असल्यास, के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये एमआरआय तपासणीसाठी रुग्णांना सहा महिन्यांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत असून, रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे, यावर उपाय म्हणून महानगरपालिकेने त्यांच्या तपासणी दरात एमआरआय काढणाऱ्या डायग्नोसिस सेंटरकडून टेंडर मागवून सध्या असलेल्या एमआरआय मशीनचं नेटवर्क अपग्रेडेशन, मशीन सपोर्ट सिस्टम अपग्रेडेशन आणि अलायड वर्क्स यासाठीदेखील टेंडर प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सिटी स्कॅन मशीनचे दर परिपत्रक महानगरपालिकेच्या के.ई.एम.,एल.टि.एम.जी आणि नायर रुग्णालयांना दिनांक ०६/०१/२०२३ रोजी पारित करण्यात आले होते. सदर मशीन महानगरपालिकेच्या के.ई.एम. व एल.टी.एम.जी. आणि नायर रुग्णालयाला वितरीत करण्यात आले असून त्यांची स्थापना झाली आहे व ते कार्यान्वित आहेत.

रा.ए. स्मारक रूग्णालयात नवीन एम.आर.आय. मशिन खरेदीचा निर्णय दिनांक ०३/०९/२०२५ रोजी घेण्यात आला असून, मार्चच्या पहिल्या आठवड्यात TURNKEY चे काम सुरु होऊन पुढील तीन महिन्यात १ नवीन अत्याधुनिक एमआरआय मशिन स्थापित करण्यात येणार आहे.

के.ई.एम. रुग्णालयात ६ सोनोग्राफी मशीन रेडीयोलॉजी विभागात कार्यान्वित आहेत. त्यापैकी ३ मशीन या पूर्णवेळ सुरु असतात. तर १ सोनोग्राफी मशीन दुर्मिळ आजाराकरीता असलेल्या निधीमधून मिळाली आहे. के.ई.एम. रुग्णालयाकरीता आणखी दोन सोनोग्राफी मशीन खरेदी दरपत्रकाचे दिनांक २१/११/२०२५ रोजी शुध्दीपत्रक पारित करण्यात आले आहे व सदर मशीन खरेदीबाबतची कार्यवाही महानगरपालिकास्तरावर सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खाते, विभागामार्फत औषधे व साहित्य इ. चे मध्यवर्ती खरेदी खात्याकडून एकूण २२५४ दरपत्रिका पैकी फक्त १०६१ दरपत्रिका अंतिम करुन संबंधित विभागास देण्यात आले आहेत. उर्वरीत ११९३ औषधे व साहित्यांची खरेदी ई-निविदाव्दारे, जीवनावश्यक औषधे व साहित्याची खरेदी स्थानिक पातळीवर तसेच तात्काळ लागणारी औषधे गरीब रुग्ण सहायता निधी, जननी शिशु सुरक्षा योजना, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व समाजविकास अधिकारी यांच्या मार्फत रुग्णांना मोफत उपलब्ध करून दिली जातात.

अत्यावश्यक व अत्यंत गंभीर आजारांच्या रुग्णांचे एम.आर.आय., सीटी स्कॅन व सोनोग्राफी तात्काळ वा त्याच दिवशी केली जातात. आंतररूग्ण रूग्णांचे एम.आर.आय., सीटी स्कॅन व सोनोग्राफी एक ते दोन दिवसात केले जातात तसेच बाह्यरुग्णांना सीटी स्कॅन करीता रुग्णांना महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयात निर्देशित करण्यात येते व एमआरआय करीता रुग्णांना महानगरपालिकेचे मान्यताप्राप्त ४ सेंटरमध्ये महानगरपालिकेच्या दरानेच एमआरआय केले जातात.

(३) अत्यावश्यक व अत्यंत गंभीर आजारांच्या रूग्णांना रुग्णालयात ताबडतोब दाखल करण्यात येते व आवश्यक सर्व चाचण्या त्याच दिवशी करण्यात येतात.

रा.ए. स्मारक रुग्णालय व सेठ गो.सु. महाविद्यालयाच्या आस्थापनेवर एकूण ५९०९ पदे मंजूर आहेत. त्यापैकी ३५०९ पदे भरलेली असून २४०० पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होऊ नये, यास्तव सरळसेवा व पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत २४०० रिक्त पदांपैकी ११०६ पदे ही कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहेत. तसेच रिक्त पदे सेवाप्रवेश नियमानुसार भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(४) रा.ए. स्मारक रुग्णालयामध्ये अत्यावश्यक गंभीर रुग्णांचे एम.आर.आय. तात्काळ व त्याच दिवशी केले जाते. आंतररुग्ण रुग्णांचे एम.आर.आय. एक ते दोन दिवसात केले जाते. बाह्यरुग्णांना महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या ४ सेंटरमध्ये महानगरपालिकेच्या दरानेच एम.आर.आय. केले जातात.

रा.ए. स्मारक रुग्णालयामध्ये १ एम.आर.आय. मशीन आहे. या मशीनचे दहावे वर्ष असून त्या मशिनचा सर्वसमावेशक देखभाल करार केलेला आहे. सदर एम.आर.आय. मशीन ९ वर्ष जूनी असल्याने नेटवर्क अपग्रेडेशन, मशीन सपोर्ट सिस्टम अपग्रेडेशन आणि अलायड वर्क्स करणे योग्य होणार नाही.

रा.ए. स्मारक रूग्णालयात नवीन एम.आर.आय. मशिन खरेदीचा निर्णय दिनांक ०३/०९/२०२५ रोजी घेण्यात आला असून दिनांक २५/०२/२०२६ रोजी आरसी (Rate Contract) प्राप्त झाली आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यात TURNKEY चे काम सुरु होऊन पुढील तीन महिन्यात १ नवीन अत्याधुनिक एम.आर.आय. मशिन स्थापित करण्याची कार्यवाही रुग्णालय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेंतर्गत मौजे शिरगाव येथील मॅरेथान नगरी समोरील रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(१३)** * **८६२४ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील मौजे शिरगाव, बदलापूर (पूर्व) येथील मॅरेथान नागरी समोरील रस्ता विकास योजनेंतर्गत प्रस्तावित असून, सदर रस्ता अपूर्णावस्थेत असल्यामुळे वापरात असलेला वहिवाटीचा रस्ता पूर्ण करण्याबाबत स्थानिक रहिवाशांनी निवेदनाद्वारे मागणी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक नागरिकांची खाजगी जमीन नगरपरिषदेने आपल्या अखत्यारित घेतल्याशिवाय वहिवाटीचा सदर अपूर्ण रस्ता पूर्ण होऊ शकत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील वहिवाटीचे रस्ते (विकासात्मक रस्ते) नगरपरिषदेने ताब्यात घेऊन विकास आराखड्यानुसार (Development Plan) उक्त रस्ता पूर्ण करण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, सदर वहिवाटीचा रस्ता ताब्यात घेऊन नगरपरिषदेचे अभियंता स्थळ पाहणी करून रस्त्याची रुंदी, जागा आणि नियोजित DP नकाशाची पडताळणी करुन रस्ता दुरुस्ती किंवा डांबरीकरण करून रुंदीकरण भूसंपादनाऐवजी, टीडीआर (Transferable Development Rights) देऊन रस्ते रुंदीकरणाची प्रक्रिया जलदगतीने करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कुळगाव-बदलापुर (पूर्व) येथील वहिवाटीचा रस्ता नगरपरिषदेने ताब्यात घेऊन सदर अपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या हद्दीतील शिरगाव, बदलापूर (पूर्व) (जि.ठाणे) येथील मॅरेथॉन नगरी समोरील रस्ता हा विकास योजनेप्रमाणे सुमारे ४० वर्षांपासून अंशत: अस्तित्वात असून यापुर्वी डांबरीकरण केलेले आहे. रस्त्याचे मजबुतीकरण करून कॉंक्रीटीकरण करण्यासाठी विकास योजनेप्रमाणे अंशत: तयार करण्यात आलेला असून पूर्ण झालेला नाही.

कुळगाव बदलापूर शहराची विकास योजना शासन निर्णय, दिनांक २५/०७/२००५ अन्वये मंजूर झाली असून दिनांक १२/०८/२००५ पासून अंमलात आली आहे. तसेच सदर योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय दिनांक ११/०८/२००८ अन्वये मंजूर झाली असून दिनांक ०१/०९/२००८ पासून अंमलात आली आहे.

विकास योजना रस्त्याने बाधित काही जमीन ही खाजगी मालकीची असून जागा ताब्यात आल्यानंतर भविष्यात संपूर्ण रस्ता विकास योजनेप्रमाणे संलग्न करता येईल. सद्य:स्थितीत रस्त्याने बाधित होणारी खाजगी जमीन टी.डी.आर. च्या माध्यमातून नगरपरीषदेस हस्तांतरीत करण्याचे प्रस्तावित नाही. रस्त्याने बाधित जागा नगरपरिषदेकडे ताब्यात आल्यानंतर उर्वरित रस्ता विकास योजनेप्रमाणे पूर्ण करता येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पांचे विकासक घर खरेदीदारांकडून आगाऊ देखभाल शुल्काची आकारणी करीत असल्याबाबत

**(१४) * ७११३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेरा कायद्यातील तरतुदींनुसार नवीन गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये ५१ टक्के सदनिकांची विक्री झाल्यानंतर तीन ते चार महिन्यात घर खरेदीदारांची सहकारी संस्था स्थापन करणे बंधनकारक असून, सदर सहकारी संस्था स्थापन होईपर्यंत विकासक / प्रवर्तकांना देखभाल शुल्क आकारण्याचा अधिकार असून आगाऊ स्वरुपात एक किंवा दोन वर्षांचे देखभाल शुल्क आकारता येत नाही, तशी कायद्यात तरतूद नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये विकासकांकडून नव्याने ताब्यात दिल्या जाणाऱ्या सदनिकांसाठी खरेदीदारांकडून प्रत्येकी पाच ते सहा लाख रुपयांपर्यंत आगाऊ देखभाल शुल्क वसूल केले जात असल्याच्या घटना वारंवार निदर्शनास येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५१% विक्री झाल्यावर ३ ते ४ महिन्यात सहकारी संस्था स्थापन करणे हे विकासकासाठी बंधनकारक असताना यातील विलंब किंवा वाद सोडवण्यासाठी कायद्यातील तरतुदीनुसार दोषी विकासकांवर कारवाई करून घर खरेदीदारांची आगाऊ देखभाल शुल्क आकारुन होणारी आर्थिक लूट थांबविण्यासाठी व रेरा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) स्थावर संपदा (नियमन आणि विकास) अधिनियम, २०१६ च्या कलम ११(४)(e) मध्ये प्रवर्तक/विकासक, लागू असलेल्या कायद्यांनुसार घर खरेदीदारांना संस्था किंवा सहकारी संस्था किंवा त्यांचे फेडरेशन तयार करणे सक्षम करेल, अशी तरतूद आहे.

उक्त अधिनियमातील कलम ११(४)(d) मध्ये प्रकल्पाची देखभाल करण्याची बाब जोपर्यंत प्रकल्पातील घर खरेदीदारांच्या संस्थेच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत प्रकल्पातील मूलभूत सेवांची देखभाल वाजवी शुल्क आकारुन करण्यास प्रवर्तक/विकासक जबाबदार असेल, अशी तरतूद आहे. याशिवाय, कलम ११(४)(g) मध्ये प्रकल्पाचा भौतिक ताबा वाटपधारक किंवा वाटपधारकांच्या संघटनेला हस्तांतरित करेपर्यंत विकासकाने घर खरेदीदारांकडून गोळा केलेल्या रकमेमधून प्रकल्पाशी संबंधित सर्व देखभाल खर्च (जमीन किंमत, जमीन भाडे, महानगरपालिका किंवा इतर स्थानिक कर, पाणी किंवा वीज शुल्क, देखभाल शुल्क, गहाण कर्ज आणि गहाणखतांवर व्याज किंवा इतर भार आणि सक्षम अधिकारी, बँका आणि वित्तीय संस्थांना देय असलेल्या इतर दायित्वांसह) करावा, अशी तरतूद आहे.

(३) प्रकल्पातील घर खरेदीदारांना प्रकल्पातील अनियमिततेबाबत स्थावर संपदा (नियमन आणि विकास) अधिनियम, २०१६ च्या कलम ३१ नुसार तक्रार दाखल करण्याची तरतूद आहे. त्यानुसार स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तक्रार दाखल झाल्यास त्यावर प्राधिकरणाकडून कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.पालघर) नगरपंचायत क्षेत्रातील सिद्धश्वरी येथील संरक्षक भिंतीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१५) * ७७५४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा नगरपंचायत क्षेत्रात वैतरणा नदीवर सिध्देश्वरी येथे (जि.पालघर) किनाऱ्याला संरक्षण देण्यासाठी बांधण्यात आलेली संरक्षक भिंत अत्यंत निकृष्ट दर्जाची व अंदाजित गुणवत्तेनुसार नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने संरक्षक भिंत बांधताना लोखंडी सळ्यांचा वापर कमी प्रमाणात केला असून लोखंड देखील निकृष्ट दर्जाचे वापरल्याने भिंतीला काही ठिकाणी तडे गेले आहेत, यामुळे वाहतुकीस व स्थानिक नागरिकांना अपघातांचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संरक्षक भिंतीच्या कामाची प्रत्यक्ष देखरेख करणारे अभियंता, अधिकारी यांनी कामाची गुणवत्ता तपासण्यात व कंत्राटदारावर नियंत्रण ठेवण्यात जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन कंत्राटदाराला नियमापेक्षा जास्त देयके अदा करण्यात आल्याचा आणि अभियंता व कंत्राटदार यांच्या संगनमताने गैरव्यवहार झाल्याचा आरोप स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी दोषी अभियंता, संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर विभागामार्फत चौकशी करुन संबंधित दोषी कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) वाडा नगरपंचायत हद्दीतील वैतरणा नदीवर सिध्देश्वरी येथे किनाऱ्याला संरक्षण देण्यासाठी बांधण्यात आलेल्या भिंतीला तडे गेलेले नाहीत. भिंतीच्या बाजूस सद्य:स्थितीत कोणताही रस्ता अस्तित्वात नसल्याने अपघातांचा धोका निर्माण झालेला नाही. संरक्षक भिंतीचे काम अंदाजपत्रकानुसार होत नसल्याचे निदर्शनास येताच संरक्षक भिंतीची स्थळपाहणी करुन कंत्राटदारास संरक्षक भिंत पाडून पुन्हा नव्याने बांधण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कंत्राटदाराने ४० मी. संरक्षक भिंत पाडली असून भिंत पाडून दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत पुन्हा नव्याने बांधून देणे अपेक्षित आहे. कंत्राटदाराने १४२ मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम केले असून पहिल्या टप्प्यातील ३५ मी. लांबीच्या संरक्षक भिंतीचे बांधकाम अंदाजपत्रकानुसार केल्याने केवळ त्याचे देयक अदा करण्यात आले आहे. उर्वरित १०७ मीटर लांबीच्या संरक्षक भिंतीचे देयक अदा करण्यात आले नसल्याने नगरपंचायतीचे आर्थिक नुकसान झालेले नाही. कंत्राटदार भिंत पाडून पुन्हा बांधून देत असल्यामुळे सद्य:स्थितीत कोणतीही कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली नाही. तथापि, कंत्राटदार संरक्षक भिंत तोडण्याचे काम अतिशय संथगतीने करत असल्याने त्यांच्याविरुद्ध नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टोकरे (ता.वसई, जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या हद्दीत वसई-विरार महानगरपालिकेने विकासकांना बांधकामाला परवानगी दिल्याने पेसा कायद्याचे उल्लंघन झाल्याबाबत

**(१६) * ७९५१ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील ग्रामपंचायत क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाने वसई-विरार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाला अधिकार दिले असून या अधिकारान्वये अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट ग्रामपंचायतीच्या भागात बांधकामासाठी परवानगी देताना बऱ्याच मर्यादा असून ना-हरकत दाखला, तसेच ग्रामपंचायतीचा ठराव घेणे ही बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई तालुक्यातील टोकरे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं. ६ मध्ये वसई-विरार महानगरपालिकेने टोकरे ग्रामपंचायतीची कोणतीच परवानगी न घेता विविध उद्योजक व विकासक यांना बांधकामाची थेट परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ठिकाणी औद्योगिकदृष्ट्या बांधण्यात येत असलेल्या इमारतींमध्ये कोणते उद्योग-व्यवसाय सुरु होणार आहेत याची ग्रामस्थांना कल्पना नसून अनधिकृतरित्या चालू असलेल्या बांधकामाला ग्रामस्थांनी वारंवार विरोध करून तसेच महानगरपालिका प्रशासनाला निवेदन देऊनही अद्याप पर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बेकायदेशीर बांधकामाला परवानगी देणाऱ्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर तसेच बांधकाम करणाऱ्या विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र.टीपीएस-१२१४/युओआर-५४/सीआर-१७/२०१५/नवि-१२, दिनांक २१/०२/२०१५ अन्वये वसई-विरार उपप्रदेशातील २१ महसुली गायांकरीता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून वसई-विरार शहर महानगरपालिकेची नियुक्ती केलेली आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमाच्या तरतुदी पाहता सदर क्षेत्रात बांधकाम परवानगी देताना ग्रामपंचायतीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात येत नाही. तसेच जिल्हाधिकारी, पालघर यांचे कडील दिनांक १८/११/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहे. 'पालघर जिल्ह्यातील ग्रामपंचायत हद्दीमध्ये (अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती धरुन) विकास कामांसाठी/ बांधकाम परवानगीसाठी/ मानीव बिनशेतीसाठी गावठण व्यतिरिक्त इतर क्षेत्रात स्थित खाजगी जमिनीच्या क्षेत्रासाठी उद्योग सुरु करणेकामी ग्रामपंचायतीच्या ना-हरकत दाखल्याची आवश्यकता असणार नाही.'

(२) महानगरपालिकेने गाव मौजे-टोकरे (ता.वसई, जि.पालघर) सर्व्हे नं ६ वर औदयोगिक बांधकामा करीता जा.क्र.VVCMC/TP/CC/VP-६२९८ & SPA VP-०९७/५३२/२०२२-२३ दिनांक ३१/०३/२०२३ रोजी परवानगी देण्यात आलेली आहे.

(३) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील तरतुदी संबंधित प्रकरणी मान्यता देण्यात आलेल्या आहेत.

तसेच महानगरपालिकेने सदरहू ठिकाणी मागील ५ वर्षात एकूण ६५ अनधिकृत बांधकामांवर (१,१९,५४० चौ. फुट अंदाजे) निष्काशनाची कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) व (५) अशी बाब नाही.

-----------------

## सप्तशृंगी (जि.नाशिक) गडावर भाविकांच्या सुरक्षिततेकरीता नवीन मार्ग विकसित करण्याबाबत

**(१७) * ८०९५ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सप्तशृंगी गड (जि.नाशिक) येथे जाण्यासाठी सद्य:स्थितीत सुमारे १० किलोमीटर लांबीचा एकमेव घाटमार्ग उपलब्ध असून सदर मार्ग हा अरुंद, तीव्र वळणांचा आणि अपघातप्रवण असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाटमार्गावर गडावर जाणाऱ्या भाविकांची संख्या बहुसंख्य असून नवरात्रोत्सव व इतर सणांच्या काळात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी व अपघातांची शक्यता वाढत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सप्तशृंगी गडासाठी नवीन पर्यायी मार्ग विकसित करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तो अनेक वर्षे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागाने सप्तशृंगी गड, नांदुरी, अभोना, कनाशी, मानूर आणि अलियाबाद भागांना जोडणाऱ्या रस्त्यासाठी नवीन संरेखन निश्चित करण्याची योजना आखली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नवीन मार्गाच्या विकासासाठी जिल्हा प्रशासनाकडून सार्वजनिक बांधकाम विभागास आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची व प्रकल्पाला प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली असूनही प्रत्यक्षात निधी उपलब्ध झाला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर मार्गांवर पावसाळ्यात भूस्खलन होण्याची शक्यता निर्माण होत असल्यामुळे गडावर खाजगी जमिनीचा अभाव आणि अपुरी पार्किंग जागा यामुळे प्रशासन आता एकेरी मार्गाप्रमाणेच प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र मार्गांची योजना आखत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता सप्तशृंगी गडासाठी नवीन मार्ग तातडीने विकसित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) व (४) सप्तशृंगी गडासाठी नवीन पर्यायी मार्ग बांधणे शक्य आहे किंवा कसे, यासाठी सदर प्रकल्पाचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यासाठीचे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, नाशिक यांचे कार्यालयामार्फत दिनांक २९/०८/२०२५ अन्वये जिल्हा नियोजन समिती, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आला आहे.
(५) हे खरे नाही.
(६) सद्य:स्थितीत सप्तशृंगी गडाला जोडणारा नांदूरी ते सप्तशृंगी गड या एकमेव रा.मा.-२१ या १० कि.मी. लांबीत केंद्रीय मार्ग निधीतून रस्ता रुंदीकरणाचे व काँक्रीटीकरणाचे तसेच घाट लांबीत संरक्षक भिंत बांधकामाचे काम प्रगतीत आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा शहरातील उद्यानांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१८)** * **८१९४ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा शहरात सुमारे ५६ उद्याने अस्तित्वात असूनही, निधीअभावी या उद्यानांची दुरवस्था झाली असून उद्यानांच्या देखभाल व स्वच्छतेसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ, उपकरणे व नियमित निधी उपलब्ध नसल्यामुळे झाडे-झुडपे, लॉन, पायवाटा, बाके, प्रकाश व्यवस्था व सार्वजनिक स्वच्छतागृहे यांची मोडतोड व पडझड होत असून, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा शहरातील, विशेषतः रावणवाडी तलाव परिसरातील उद्यानांची (Parks) योग्य देखभाल व व्यवस्थापन करणे गरजेचे असून यासाठी सिंचन प्रकल्पांच्या देखभाली सोबतच स्वच्छ पिण्याचे पाणी, सुशोभीकरण, आणि सुरक्षिततेची सोय करणे, तसेच पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन पायाभूत सुविधा बळकट करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भंडारा शहरात असलेल्या विविध उद्यानात सुसज्ज बाकडे, मुलांसाठी खेळणी, चालण्यासाठी पदपथ (Walking track) व सुशोभीकरण वाढवणे, उद्यानांमध्ये नियमित साफसफाई व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, बाहेरील पर्यटकांची गर्दी पाहता, सुरक्षारक्षक व आवश्यक सुरक्षितता उपाययोजना करण्याच्या दृष्टीने तेथील स्थानिक नगरपालिका प्रशासनाने व शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) असल्यास, शासनाच्या 'स्मार्ट सिटी' व नागरी जीवनमान सुधारणा उद्दिष्टांवर शहरातील उद्यानांच्या दुरवस्थेमुळे परिणाम होत असून बगिच्यांच्या देखभालीसाठी मंजूर निधी अपुरा ठरत असून, उपलब्ध निधीचा प्रभावी वापर न झाल्यामुळे व योग्य नियोजनाअभावी कामे अर्धवट असून भंडारा शहरातील सर्व बगिच्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, नियमित देखभाल, स्वतंत्र निधी व प्रभावी व्यवस्थापन यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) रावणवाडी तलाव परिसर हा भंडारा नगरपरिषदेच्या हद्दीत नसून रावणवाडी ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहे. सदर तलाव परिसर वन विभागाच्या अखत्यारित येत असून, या पर्यटन क्षेत्राच्या विकास कामाकरीता तयार केलेल्या एकूण १९६०.५३ लक्ष इतक्या प्रकल्प आराखड्यास महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या २२ व्या सभेमध्ये दिनांक ०६/०२/२०२४ रोजी मान्यता प्रदान केली असून सदर प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी वन विभागाकडे दिनांक २२/०९/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे.
(३) भंडारा नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये एकूण ३ उद्याने असून उर्वरित नगरपरिषदेच्या खुल्या ९ जागा विकसित करुन त्यामध्ये सुसज्ज बाकडे, मुलांसाठी खेळणी, चालण्यासाठी पदपथ, पिण्याच्या पाण्याची सोय, ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

तसेच, नगरपरिषदेमार्फत ३ बगिच्यांसाठी सुरक्षा रक्षक नेमण्यात आले असून त्यांच्यामार्फत साफसफाई व गर्दीचे नियोजन केले जाते.
(४) भंडारा शहरातील सर्व बगिच्यांची नियमित देखभाल व दुरुस्ती नगरपरिषदेच्या निधीतून करण्यात येते. तसेच, उद्यान विभागात १ उद्यान पर्यवेक्षक, २ बागवानाची पदे कार्यरत असून ७ कर्मचारी कंत्राटी पद्धतीने देखभाल दुरुस्तीसाठी नेमण्यात आले आहेत.

भंडारा शहरात उद्याने विकसित करण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत रुपये १ कोटी इतकी रक्कम मंजूर करण्यात आली असून उद्यान विकसित करण्याची कार्यवाही भंडारा नगरपरिषदेमार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मेट्रो मार्ग-९ मार्गिकेअंतर्गत मीरा-भाईंदर येथे दोन मार्गिकांचा पूल बांधल्याबाबत

**(१९) * ८४६३ अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) दहिसर-मिरा-भाईंदर मेट्रो मार्ग - ९ मार्गिकेअंतर्गत मिरा-भाईंदर येथे चार मार्गिकांचा पूल अचानक दोन मार्गिकांचा करण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेट्रो मार्ग - ९ च्या मार्गावर हा पूल उभारला असून जागा कमी असल्यामुळे हा पूल मध्येच अरुंद असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होण्याची व अपघाताची शक्यता निर्माण झाली असून सुरक्षा चाचणी पूर्ण होताच हा पूल आता टप्प्याटप्प्यांनी वाहतुकीसाठी खुला होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पुलाच्या रचनेसाठी आराखडा २०२०-२१ मध्येच तयार करण्यात आला असून ही अरुंद रचना सध्या तात्पुरती असून आराखड्यानुसार पुलाचा पुढे विस्तार करण्यात येणार आहे व हा पूल मिरा भाईंदर पूर्व-पश्चिम जोडणार असून पश्चिम रेल्वे मार्ग ओलांडून भाईंदर पूर्वेपर्यंत बांधणार येत असल्यामुळे वाहतूक कोंडी आणखी वाढण्याबरोबर अपघाताची भीती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एमएमआरडीएने चार मार्गिकांचा पूल पुढे दोन मार्गिकांचा करण्यामागील कारणे काय आहेत, सदर उड्डाणपुलाच्या रचनेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्यास, तो दूर करण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, सदर उड्डाण पुलाची रचना बदलणाऱ्या संबंधित एम.एम.आर.डी.ए. अभियांत्रिकी तंत्रज्ञ व प्रशासकीय अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४), (५) व (६) मुंबई मेट्रो मार्ग - ९ (दहिसर (पूर्व) ते मीरा भाईंदर) प्रकल्पाच्या संरचनेमध्ये उपलब्ध असलेली मर्यादित जागा, विद्यमान वाहतूक घनता व भविष्यातील विस्तार इ. बाबी विचारात घेऊन सविस्तर अभियांत्रिकी आराखड्यानुसार मेट्रो व उड्डाणपुलाची एकात्मिक रचना (दुमजली उड्डाणपुल) करण्याचे निश्चित करण्यात आले. सदरहू रचना मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय सल्लागाराच्या तपासणीनंतर निश्चित करण्यात आली आहे.

मुंबई मेट्रो मार्ग-९ च्या संरेखनमध्ये काशिमीरा फ्लायओवर कनेक्टर ते गोल्डन नेस्ट जंक्शन दरम्यान एकात्मिक दुमजली उड्डाणपुल हा ४ टप्प्यात उभारण्यात येणाऱ्या १) काशिमीरा कनेक्टर ते काशी गाव (२) प्लेझंट पार्क ते सिल्व्हर पार्क, (३) सिल्व्हर पार्क ते शिवार गार्डन जंक्शन, (४) शिवार गार्डन ते आझाद नगर (गोल्डन जंक्शन) या २+२ मार्गिकेच्या ४ उड्डाणपुलांपैकी प्लेझंट पार्क ते सिल्व्हर पार्क, सिल्व्हर पार्क ते शिवार गार्डन जंक्शन हे २ उड्डाणपूल वाहतुकीसाठी अनुक्रमे दिनांक २७/०८/२०२४ आणि दिनांक ०८/०३/२०२५ रोजी सुरू करण्यात आले आहेत. काशिमीरा कनेक्टर ते काशीगाव या टप्प्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याचे ६०% काम पूर्ण झाले असून माहे मे, २०२६ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजित आहे.

शिवार गार्डन ते आझाद नगर (गोल्डन जंक्शन) हा दुमजली उड्डाणपुलाचा टप्पा ते पुढे रेल्वे मार्ग ओलांडून पुढे पश्चिमेला मांडली तलावापर्यंत २+२ मार्गिका प्रस्तावित होती. तथापि, या संरेखनामध्ये आझादनगर पासून पुढे २+२ मार्गिकेकरीता जागा (RoW) उपलब्ध होऊ न शकल्याने या ठिकाणी आझादनगर ते भाईंदर पश्चिम दरम्यान १+१ मार्गिकेचा उड्डाणपुल आखणी करणे प्राधिकरणास भाग पडले. त्यानुसार शिवार गार्डन ते आझाद नगर दरम्यान २+२ मार्गिकेचा उड्डाणपूल पूर्ण करुन तो आझादनगर येथे खाली पोहोच मार्गाने उतरविण्यात आला. तसेच आझादनगर ते भाईंदर पश्चिम जोडणीकरीता १+१ मार्गिकेच्या उड्डाणपुलाच्या उभारणीचे काम प्राधिकरणामार्फत प्रस्तावित आहे.

या उड्डाणपुलांच्या उभारण्यामुळे मुंबईकडून येताना काशिमीरा कनेक्टर वरुन थेट भाईंदर पूर्व व भाईंदर पश्चिम येथील दाट लोकवस्ती प्रदेशाला थेट जोडणी प्राप्त होईल. यामुळे या भागातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. तसेच या उड्डाणपुलांच्या उभारणीमुळे मिरा भाईंदर मधील मुख्य रस्त्यावरील चौकात (जंक्शन) विनाअडथळा वाहतूक करणे शक्य होईल.

सद्य:स्थितीत आझादनगर येथे २+२ मार्गिकेची जेथे १+१ मार्गिका होत आहे, त्याठिकाणी सुरक्षित वाहतूक व्यवस्थापन करण्यासाठी भारतीय रस्ते काँग्रेस (IRC) यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आवश्यक त्या सर्व उपाययोजना जसे की, मार्गदर्शक खांब/ दिशादर्शक परावर्तक, कंपन पट्ट्या, परावर्तित दिशादर्शक फलक, इशारा फलक, माहिती फलक, उंची मर्यादा दर्शक, कमी उंचीचे रस्ता विभाजक व इतर सुरक्षा उपाययोजना करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पातील सर्व कामे मान्यताप्राप्त डिझाइन व तांत्रिक सल्लागारांच्या पर्यवेक्षण व मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत पूर्णपणे कटिबद्धता असून, सर्व सुरक्षा उपाय, वाहतूक व्यवस्थापन व स्वतंत्र सुरक्षा लेखापरीक्षण पूर्ण केल्यानंतरच प्रकल्प सार्वजनिक वापरासाठी खुला करण्यात येणार आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेत कंत्राटदारांना मोबिलायझेशन ॲडव्हान्स देऊन अनियमितता केल्याबाबत

**(२०) * ८३३७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत कंत्राटदारांना ॲडव्हान्स दिल्याचे दाखवून अनियमितता केली असून, कंत्राटदारांना रुपये ३ लाख कोटी ॲडव्हान्स मोबिलायझेशन मधून देण्यात आले असून सदर निधी विकासकामासाठी वापरला न जाता अन्य प्रयोजनांसाठी वापरला जात असल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते, कचरा, कोविड सेंटर, टॅब खरेदी, नालेसफाई आदी मुंबई महानगरपालिकेच्या कामांमध्ये गेल्या २५ वर्षांत सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांच्या अपहार झाला असून निधी प्राप्त होऊनही रस्त्यांची दुरवस्था तशीच राहिली आहे, तसेच निविदा प्रक्रियेतील अनियमितता, काळ्या यादीतील कंपन्यांना निविदा देणे, नालेसफाई मध्ये गाळ न काढताच न कंत्राटदारांना निधी देणे, दोन हजार कोटी खर्च करून मिठी नदीचा प्रकल्प २० वर्षानंतर अपूर्णच राहिला आहे, इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन तसेच महालेखाकारांतर्फे स्वतंत्र लेखापरीक्षण करुन यात दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येते आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने पोईसर नदीच्या पुनरुज्जीवनकरीता रुपये ७८.५० कोटी, रस्ते विभागामार्फत ४ कामांकरीता रुपये २१४.४१ कोटी, पुलाच्या बांधकामाकरीता रुपये ९००.३२ कोटी, तर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाकरीता रुपये ५० कोटी कंत्राटदारांना मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्यात आला आहे. सदर मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिलेल्या कामांकरीता वापरण्यात येत असून प्रचलीत पद्धतीनुसार महानगरपालिकेकडून परतावा करून घेण्यात येत आहे.

(२) मिठी नदी विकास प्रकल्पांतर्गत टप्पा १ मध्ये मिठी नदीचे १६ ते ६० मीटर पर्यंत रुंदीकरण व गाळ काढण्याचे काम सन २००६ मध्ये पूर्ण केले आहे. तसेच टप्पा २ मध्ये (फिल्टरपाडा, पवई ते सी.एस.टी. पुल कुर्ला दरम्यान) मिठी नदीचे अतिरिक्त रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत या कामाचा समावेश होता. यानुसार रुंदीकरण व खोलीकरणाचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे. संरक्षण भिंत बांधण्याचे काम ९१ टक्के, मलनि:सारण वाहिनीचे काम ६२ टक्के काम पूर्ण झाले असून सेवा रस्ता बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मिठी, दहिसर, पोईसर आणि ओशिवरा या नद्या पुनरुज्जीवित करण्याबाबत

**(२१)** * **८५३४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील मिठी, दहिसर, पोईसर आणि ओशिवरा या चार प्रमुख प्रदूषित नद्या अनियंत्रित शहरीकरणामुळे प्रदूषित झाल्या असून त्यांचे पुनरुज्जीवित करुन सौंदर्यीकरण करणेबाबत मागणी होत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील उक्त चार नद्यांमध्ये सोडले जाणारे सांडपाणी, टाकला जाणारा कचरा यामुळे या नद्यांना आता नाल्याचे स्वरूप प्राप्त झाले असून, या चारही नद्या संपूर्णपणे प्रदूषणमुक्त होऊन त्यांना पूर्वीचे वैभव व्हावे याकरीता जनजागृती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, मुंबईमध्ये मॅग्रोव्ह वनस्पतींची मोठ्या प्रमाणावर तोडणी होत असून जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप होत असून ती रोखून नॅशनल पार्कप्रमाणेच आरे कॉलनी या परिसराला अभयारण्याचा दर्जा मिळाल्यास बोरिवली, आरे कॉलनीमधून वाहणाऱ्या नद्यांमधील प्रदूषण रोखण्यास मदत होईल तसेच या नद्यांच्या प्रदूषित पाण्याबरोबर कचराही समुद्राच्या पोटात जात असल्याने समुद्रातही मासे मिळण्याचे प्रमाण कमी होत चालले आहेत, मुंबईतील मच्छीमारांचा व्यवसाय यामुळे धोक्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) उभारण्यासाठी शासनाने एखादे 'विशेष आर्थिक पॅकेज' किंवा 'मिठी नदी विकास प्राधिकरणा'च्या धर्तीवर इतर नद्यांसाठी स्वतंत्र प्राधिकरण स्थापन करण्याबाबत कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, मुंबईतील नद्या प्रदूषणमुक्त झाल्यास मुंबईतील सागरकिनारेही स्वच्छ राहतील त्याचबरोबर शहराचे पर्यावरण संतुलनही नीट राखले जाईल याकरीता या चारही नद्या संपूर्णपणे प्रदूषणमुक्त होऊन त्यांना पूर्वीचे वैभव व्हावे याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

सदर बाब ही फेब्रुवारी, २०२६ पूर्वीच महानगरपालिकेच्या निदर्शनास आली आहे व त्याकरीता नद्यांच्या पुनरुज्जीवनाकरीता महानगरपालिकेने कामे हाती घेतले आहेत.
(२) नद्यांमध्ये टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणावर आळा घालण्याकरीता महानगरपालिकेमार्फत नागरिकांनी नद्यांमध्ये कचरा टाकू नये असे सूचना फलक नद्यांच्या किनारी प्रदर्शित करण्यात आले आहेत. होणारे प्रदूषण रोखण्याकरीता प्रभावी जनजागृतीच्या दृष्टीने समाज माध्यमे (सोशल मीडीया) व वृत्तपत्रीय जाहिराती याद्वारे नियमितपणे जनजागृती केली जाते. कचरा टाकताना आढळून आल्यास संबंधितावर नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाते.

याशिवाय मिठी, दहिसर व पोईसर या नद्यांचे उगमस्थान असलेल्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हद्दीमध्ये उद्यान प्रशासनाकडून संबंधित भागामध्ये कचरा टाकणे, सांडपाणी सोडणे तसेच प्रदूषणकारी कृतीवर निर्बंध आणले आहेत.
(३) कांदळवन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. कांदळवन क्षेत्राचे संरक्षणाच्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्रात निगराणी ठेवण्याकरीता १९५ ठिकाणांवर ६६९ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे प्रदुषणाचे प्रमाण वाढले आहे त्याचा काही अंशी परिणाम मत्स्यव्यवसायावर झालेला आहे.
(४) व (५) मिठी नदी विकास प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता नगरविकास विभाग, शासन निर्णय दिनांक १९ ऑगस्ट, २००५ अन्वये मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. तसेच दहीसर पोईसर व ओशिवरा नद्यांकरीता स्वतंत्र प्राधिकरणाची सद्य:स्थितीत स्थापना करण्यात आलेली नाही. तथापि, नद्यांचे प्रदूषण कमी करण्याकरीता महानगरपालिकेने अनेक प्रकल्प हाती घेतले आहेत. यामध्ये मिठी नदीचे रुंदीकरण, खोलीकरण, संरक्षक भिंत बांधणे, सेवा रस्ता बांधणे अशी कामे करण्यात येत आहेत. तसेच नद्यांच्या पुनरुज्जीवनाकरीता मलजल प्रक्रिया केंद्रे बांधणे, सेवा रस्ते, पावसाळी गटारे, मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे तसेच इंटरसेप्टर बांधणे ही कामे करण्यात येत आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुना बुधगाव रोड (जि.सांगली) येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२२) * ८५९५ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुना बुधगाव रोड उड्डाणपुलाचे (जि.सांगली) काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याने सांगली ते विटा फलटण असा राज्यमार्ग सदर पुलावरुन जात असून नवीन पुलाचे काम करण्यासाठी जुना पुल वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सांगलीतून तासगाव विट्याकडे जाण्यासाठी किंवा येण्यासाठी जुना बुधगाव रस्ता या पर्यायी मार्गाचा अवलंब करावा लागत असून उड्डाण पुलाचे काम करण्याआधीच या मार्गाचे रुंदीकरण, मार्गीकरण केले गेले नसून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर परिसरातील रहिवासी आणि वाहनधारकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून निकृष्ट दर्जाचे काम, अपुऱ्या मजुरांची संख्या आणि पर्यायी मार्गांची दुर्दशा यामुळे या प्रकल्पाला विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुलाचे काम वर्षभर प्रलंबित राहिल्यामुळे नागरिक त्रस्त असून स्थानिक रहदारीवर मोठा ताण पडत आहेत, पर्यायी मार्गांची योग्य देखभाल न केल्यामुळे वाहनचालकांना त्रास होत असून स्थानिक नागरिकांनी पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सांगली शहरातील जुना बुधवार रोड वरील रेल्वे उड्डाणपुलाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही. सदर रस्ता व रेल्वे उड्डाणपुलाचे काम हे सांगली कुपवाड महानगरपालिका हद्दीत येत असून सदरचे काम MRIDC मार्फत सुरु आहे. सद्य:स्थितीत MRIDC यांचे कडून प्राप्त माहितीनुसार, सांगली जिल्ह्यातील जुना बुधगाव रोडवरील लेव्हल क्रॉसिंग क्रमांक १२९ येथे रेल्वे ओव्हर ब्रीज (ROB) चे बांधकाम MRIDC मार्फत प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पांतर्गत मुख्य पूल आणि पोहोच रस्त्याचे काम ८५ % पूर्ण झाले आहे. सदर आरओबीच्या बांधकामादरम्यान विद्यमान पूल/रस्ता सार्वजनिक वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केलेला नसून तात्पुरत्या वळण रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(२) हे खरे नाही. सदर आरओबीच्या बांधकामादरम्यान विद्यमान पूल/रस्ता सार्वजनिक वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केलेला नसून तात्पुरत्या तयार करणेत आलेल्या वळण रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.
(३) हे खरे नाही. MRIDC यांचेकडून प्राप्त माहितीनुसार पुलाचे व रस्त्याचे काम ८५ % पूर्ण झाले असून वळण रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे. कामाची गुणवत्ता MRIDC मार्फत वेळोवेळी तपासली असून दर्जा समाधानकारक आहे. तसेच सा.बां. विभागाकडे कोणतीही गुणवत्तेबाबत तक्रार प्राप्त नाही.
(४) हे खरे नाही. MRIDC (महारेल) यांच्याकडे अशा स्वरुपाची कोणतीही तक्रार/मागणी प्राप्त झालेली नाही आणि सुलभ वाहतुकीसाठी आवश्यकतेनुसार रस्त्याची देखभाल केली जात आहे. तसेच सा.बां. विभागाकडे या ROB बाबत स्थानिक नागरिकांचे कोणतेही निवेदन प्राप्त नाही.
(५) MRIDC (महारेल) मार्फत काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) MRIDC यांनी कळविलेनुसार, पुलाचा रेल्वे भाग हा प्रकल्पातील तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचा टप्पा आहे. या भागासाठी आवश्यक असलेली सविस्तर स्ट्रक्चरल डिझाईन आणि रेखाचित्रे मध्य रेल्वे मुख्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत. त्यास मंजूरी मिळाल्यानंतर, रेल्वे भागाचे काम त्वरीत सुरु करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## पालघर जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत बसविलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांच्या खरेदी प्रक्रियेत आर्थिक अनियमितता झाल्याबाबत

**(२३) * ८३९१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेराच्या खरेदी प्रक्रियेत तीनपट खर्च अधिक दाखविला असून प्रत्यक्षात दीड ते दोन लाखात मिळणारा कॅमेरा संच नऊ ते दहा लाख रुपयांना खरेदी केला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात आले यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडून होणे अपेक्षित होते, त्यावेळी तांत्रिक अडचणी दाखवून ही सर्व प्रक्रिया जाणीवपूर्वक जिल्हा नियोजन समितीच्या ताब्यात देण्यात आली पालघर, जिल्हा नियोजन समितीने नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत ३८ शाळांसाठी सीसीटीव्ही बसविण्याचे काम मंजूर करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही शाळांमध्ये कॅमेरे अजूनही बसवले गेले नाहीत, तर काही ठिकाणी आवश्यकतेपेक्षा जास्ती लावण्यात आले, विद्यार्थ्यांच्या नावाखाली झालेल्या खर्चामुळे शिक्षण क्षेत्रात संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या साहित्याची खरेदी करताना शिक्षण संचालक यांच्याकडून तांत्रिक मान्यता तर व्ही.जे.टी.आय. संस्थेकडून तांत्रिक मापदंड देण्यात आले, परंतु तरी देखील या संस्थेची टेंडर प्रकिया राबविणाऱ्या या यंत्रणेने या साहित्याचे बाजारमूल्य तपासणे आवश्यक होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, काही शाळांमध्ये संच कार्यान्वित असून सदर संच तपासणी, वस्तुस्थिती पाहणे याबाबत शिक्षण विभागाला अवगत करणे आवश्यक असताना कॅमेरे बसविले किंवा नाही हे सांगण्यासाठी नियोजन विभागाने अहवाल मागविला असता, व्हीजेटीआय संस्थेने ३८ शाळांची पाहणी करून तांत्रिक बाबी तपासल्याचे नियोजन विभागाला दिलेल्या अहवालात म्हटले असले तरी अशी कोणत्याच संस्थेच्या प्रतिनीधींनी तपासणी केली नसल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर खरेदी प्रक्रिया तात्काळ रद्द करुन व्हीजेटीआय या संस्थेमार्फत सदरहू कॅमेरा खरेदी प्रकरणी झालेल्या आर्थिक अनियमिततेबाबत ठेकेदाराला काळ्या यादीत टाकून या संस्थेमार्फत सदरहू कॅमेरा खरेदी प्रकरणी झालेल्या आर्थिक अनियमिततेबाबत शासनाने चौकशी करून दोषीवंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI), मुंबई या संस्थेकडून तांत्रिक मापदंड व प्रति शाळा रक्कम रुपये ९.३० लक्ष (सर्व करांसहित) इतकी कळविण्यात आली होती. त्यानुसार जेम प्रणालीद्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती, असे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पालघर यांनी शिक्षण विभाग प्राथमिक येथील अपुरे मनुष्यबळ व शिक्षण विस्तार अधिकारी यांचे सर्व पदे रिक्त असल्याचे कारणास्तव जिल्हा नियोजन समिती, पालघर कार्यालयामार्फत निविदा प्रक्रिया व खरेदी प्रक्रिया राबविण्याबाबत हरकत नसल्याचे कळविले होते. त्यानुसार जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकडून ३९ जिल्हा परिषद शाळांसाठी जेम प्रणालीद्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे, असे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(३) शिक्षण विभाग, जि.प. पालघर यांचेकडून सर्व ३९ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित झाल्याबाबतचा अहवाल प्राप्त आहे. तसेच प्रत्येक ३९ स्वतंत्र शाळांचा साहित्य पुरवठा व सुस्थितीत कार्यान्वित असलेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त आहे. VJTI, Mumbai संस्थेने सादर केलेल्या मापदंडानुसार प्रति शाळा ८ कॅमेरे बसविणेकरीता कळविण्यात आले होते. तरी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय शाळा परिसरात आवश्यकतेनुसार प्रति शाळा ९ कॅमेरा बसविण्यात आले आहेत, असे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(४) व्हीजेटीआय संस्थेने तांत्रिक मापदंडाचे दर विविध पोर्टल्स व बाजार सर्वेक्षणांनूसार पुष्टी करण्यात आल्याचे कळविले होते. त्यानुसार जेम प्रणालीद्वारे निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती, असे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(५) शिक्षण विभाग, जि.प. पालघर यांचेकडून सर्व ३९ जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रण कार्यान्वित असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त आहे. व्हीजेटीआय संस्थेने शाळेस भेट देऊन सीसीटीव्ही संच तपासणी अहवाल सादर केलेला आहे, असे जिल्हाधिकारी, पालघर यांनी कळविले आहे.

(६) व (७) वरीलप्रमाणे.

-----------------

## वाडा (जि.पालघर) येथील पशुवैद्यकीय चिकित्सालय, कार्यालय व निवासस्थान इमारतींचे बांधकामात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * ७७५७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथे पशुवैद्यकीय चिकित्सालय, कार्यालय व निवासस्थान या दुमजली इमारतीसाठी रुपये ४ कोटी एवढ्या रकमेचा निधी मंजूर असतानाही, कंत्राटदाराने शासकीय नियमांचे उल्लंघन करुन धुळयुक्त दगडी पावडर वापरुन अत्यंत निकृष्ट व धोकादायक बांधकाम केल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता आणि शाखा अभियंता यांनी कंत्राटदाराशी आर्थिक संगनमत करुन साहित्याची कोणतीही प्रयोगशाळा तपासणी न करता, बोगस अहवाल देऊन शासनाच्या कोट्यवधी निधीचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिकाऱ्यांनी कर्तव्यात अक्षम्य कसूर करुन भविष्यात कोसळू शकणाऱ्या इमारतीचे बांधकाम जाणीवपूर्वक सुरु ठेवल्याने इमारतीच्या संरचनेवर गंभीर परिणाम होऊन भविष्यात इमारत वापरासाठी धोकादायक ठरून जनतेच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी आढळून आलेल्या संबंधित दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत आणि कंत्राटदाराला कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकून दोषी अधिकाऱ्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत उच्चस्तरीय चौकशी करुन त्यांच्याकडून नुकसानीची वसुली करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

सदर इमारतीचे बांधकामामध्ये Crushed Sand चा वापर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

बांधकाम साहित्याच्या चाचण्या घेण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे निधीचा अपहार झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत असताना कंत्राटदारांना देयके अदा केल्याबाबत

**(२५) * ८४७७ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडखड, साकूर, कुंडाचा पाडा, आपटाळे, केळीचा पाडा, आळिवमाळ, आखर ते साकूर (ता.जव्हार, जि.पालघर) येथील सिमेंट रस्त्यांच्या कामांसाठी रुपये ६ ते ८ कोटी एवढ्या रकमेचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सामान्यत: कामे पूर्ण झाल्यानंतर विभागाने निधी वर्ग करणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष काम पूर्ण न होता तसेच पूर्वी झालेलीच कामे दाखवून सदर कामांचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान सार्वजनिक बांधकाम विभागाने संबंधित ठेकेदारांना ९० टक्के निधी वर्ग केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने मागील ६-७ महिन्यांपासून रस्त्याचे बजेट मांडले नाही वा नवीन कामांना मंजुरी दिली नसताना ही सदर कोणती कामे दाखवून निधी वर्ग करण्यात आला आहे, याबाबत नागरिकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला असून या संदर्भात उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी वारंवार करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जव्हार बांधकाम विभागातील (तत्कालीन ठाणे जिल्हा) अधिकारी आणि ठेकेदारांनी संगनमताने शासकीय निधीचा गैरवापर केला असून अनेक रस्ते व कामे सुस्थितीत असतानाही किंवा कामे अर्धवट असतानाही त्यांचे देयक काढून तसेच साहित्याची भंगारात विक्री, बनावट बिले आणि तांत्रिक गैरव्यवहार करुन निधी हस्तगत केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सार्वजनिक निधीचा योग्य वापर आणि कामाचा दर्जा टिकून राहावा याकरीता सदर प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) अंशतः खरे आहे.

खडखड, साकूर, कुंडाचा पाडा, आपटाळे, केळीचा पाडा, आळिवमाळ, आखर ते साकूर (ता.जव्हार, जि.पालघर) प्रजिमा १०७ सदरील रस्त्यावर सा. क्र.०/००० ते १९/००० मध्ये एकूण ६ कामे जुलै, २०२३, डिसेंबर २०२३ व जुलै, २०२४ या अर्थसंकल्पात मंजूर झालेली आहेत. या मंजूर कामांची एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम रुपये ७९० लक्ष इतकी आहे.
(२) हे खरे नाही.

सदरील ६ कामांपैकी पूर्ण झालेल्या कामांची देयके शासनाकडून प्राप्त निधीनुसार कंत्राटदारास निविदा अटीशर्तीतील नियमांनुसार अदा केलेली आहेत.
(३) हे खरे नाही.

सदर कामे माहे जुलै, २०२३, डिसेंबर, २०२३ व जुलै, २०२४ च्या शासन अर्थसंकल्पात मंजूर झालेली आहेत.
(४) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा क्रीडा संकुले व क्रीडा सुविधा विकसित करण्यासाठी वितरीत केलेल्या निधीचा प्रभावीपणे वापर करण्याबाबत

**(२६) * ८२१८ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: गोंदिया, यवतमाळ, अकोला, पुणे, चंद्रपूर, नागपूर, वाशीम, नांदेड, अहिल्यानगर, सातारा व पालघर आदी जिल्ह्यांना क्रीडा विभागामार्फत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून डीपीडीसी अंतर्गत कोट्यवधी रकमेचा निधी सन २०२४-२५ मध्ये वितरित करण्यात आला परंतु ठोस नियोजन व वेळापत्रक अभावामुळे क्रीडा संकुले, क्रीडांगणे व क्रीडा सुविधा अद्याप पूर्ण झालेल्या नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी वेळेत खर्च न झाल्यामुळे तसेच प्रकल्प अपूर्ण राहिल्यामुळे क्रीडा पायाभूत सुविधांसाठी मंजूर शासकीय निधीचा अपव्यय होत असल्याच्या तक्रारी माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, क्रीडा विभाग, जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा नियोजन समिती व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव असल्यामुळे निधी उपलब्ध होऊनही क्रीडा संकुले प्रत्यक्षात कार्यान्वित होऊ शकली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, क्रीडा विभागाला मिळालेल्या निधीच्या वापरात झालेल्या विलंब व त्रुटींच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून झाले व सर्व जिल्ह्यांमध्ये क्रीडा संकुले व सुविधा वेळेत पूर्ण करून युवकांना उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती सुनेत्रा पवार :** (१) हे खरे नाही.

गोंदिया, यवतमाळ, अकोला, पुणे, चंद्रपूर, नागपूर, वाशीम, नांदेड, अहिल्यानगर, सातारा व पालघर या जिल्ह्यांना जिल्हा नियोजन समिती मार्फत युवक कल्याण योजना, व्यायामशाळा विकास योजना, नाविन्यपूर्ण योजना, क्रीडांगण विकास योजना व समाजसेवा शिबीर या योजनांकरीता रुपये १०८.५१ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी रुपये ८६.४४ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद क्षेत्रातील सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(२७) * ८५३५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात गटार व्यवस्था व सांडपाणी सुविधांच्या अभावाबद्दल नुकत्याच पार पडलेल्या सुनावणीदरम्यान मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली असून उक्त क्षेत्रात सांडपाण्यामुळे पर्यावरणीय हानी होत असल्याची तसेच उल्हास नदीत प्रक्रिया न केलेला कचरा सांडपाणी सोडणे सहन करु शकत नसून हे पर्यावरणीय कायद्याचे उल्लंघन असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिसरातील ड्रेनेज व सांडपाणी सुविधांच्या अभावामुळे नागरिकांची गैरसोय होत असून नवी मुंबई आणि राज्यातील इतर सुनियोजित शहरांसारख्या सुव्यवस्थित शहरांच्या धर्तीवर कुळगाव-बदलापूरला एक आदर्श शहर बनविण्यासाठी तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजनांचा आराखडा तयार करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, नगरपरिषद क्षेत्रातील १२ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प (STP) तातडीने कार्यान्वित करण्यात येईल, असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर STP प्रकल्पाची सद्य:स्थिती काय आहे, प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी आतापर्यंत कोणती प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक कार्यवाही करण्यात आली आहे तसेच प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवून अद्याप पर्यंत प्रकल्प कार्यान्वित करण्यात विलंब होत असून सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी किंवा कंत्राटदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.७४०४/२०२४ मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार कुळगाव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात जनहितार्थ तातडीच्या दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासाठी कुळगाव-बदलापूर नगरपरिषद क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली कृती आराखडा अंमलबजावणी सुधार समिती गठीत करण्यात आली आहे. राज्यातील इतर सुनियोजित शहरांच्या धर्तीवर कुळगाव-बदलापूर नगरपरिषद शहराला आदर्श शहर बनविण्याच्या अनुषंगाने सुधार समितीने सुचविलेल्या अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे काम नगरपरिषदेमार्फत सुरू आहे.
(३) व (४) जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान (JNNURM) अंतर्गत सांडपाणी व्यवस्थापनासाठी सांडपाणी योजनेचा पहिला टप्पा राबविण्यात आला आहे. त्यानंतर कुळगाव-बदलापूर मलनिःसारण योजना टप्पा-२ ठेव तत्त्वावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देण्यात आला आहे. सदर योजनेच्या अंदाजपत्रक व आराखड्यास तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असून अमृत अभियानातंर्गत रुपये ३१.४४ कोटी इतक्या रकमेस दिनांक ०७/१२/२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याअंतर्गत शिरगाव (१२ MLD) व सोनिवली (१० MLD) या दोन्ही सांडपाणी प्रक्रिया केंद्रांची कामे पूर्ण झाली असून चाचणी व तपासणी (Testing & Commission) पूर्ण झाली आहे. सदर कामाची कार्यान्वित यंत्रणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून प्राधिकरणाकडून तांत्रिक परीक्षण करुन प्रकल्प नगरपरिषदेकडे हस्तांतरण झाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** | **डॉ. विलास आठवले**
**मुंबई.** | **सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.